## दल्ली दरबार

रवींद्र दाणी

दहिवडा

देवेगौडा पिता-पुत्रांचे राजकीय नाटक कर्नाटकाच्या राजकीय रंगमंचावर खेळले जात असताना राज्याचे माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोईली देवेगौडा पंतप्रधान कसे झाले याचा किस्सा राजधानीत पत्रकारांना ऐकवीत होते. ही घटना आहे १९९६ची. राजधानीतील आंध्रप्रदेश भवनात नवा पंतप्रधान निवडण्यासाठी संयुक्त मोर्चाच्या नेत्यांची बैठक सुरू होती. पंतप्रधानाच्या नावावर मतैक्य होत नव्हते. बैठकीला उपस्थित असणाऱ्या नेत्यांपैकी करुणानिधी यांना भूक लागल्याने ते बाहेरच्या कक्षात आले आणि त्यांनी दहिवड्याची ऑर्डर दिली. करुणानिधी बाहेर आल्यानंतर लालूप्रसाद यादवही बाहेर आले. करुणानिधी बाहेर येऊन काय बोलत आहेत हे लालूला जाणून घ्यायचे होते. करुणानिधी आपल्या सचिवास दहिवड्याबाबत विचारीत होते आणि लालूला ते देवेगौडांबाबत बोलत आहेत असे वाटत होते. करुणानिधींच्या मनात देवेगौडा आहेत असे समजून लालूने बैठकीत येऊन देवेगौडांचे नाव सुचविले. उपस्थित नेत्यांनी त्या नावाला पाठिंबा दिला आणि देवेगौडा पंतप्रधान झाले. ही सारी माहिती स्वत: वीरप्पा मोईली देत असल्याने त्यावर विश्‍वास ठेवण्यास हरकत नाही असे मानले जाते. भारताच्या राजकारणात काहीही होऊ शकते. दहिवड्याचा देवेगौडा व्हावा तसे .

बिमारू

माजी उपराष्ट्रपती भैरोसिंग शेखावत राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत पराभूत झाले असले तरी ते सक्रिय आहेत. वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. एका पुस्तक विमोचन समारोहात बोलताना भैरोसिंगांनी एक किस्सा सांगितला. ते राजस्थानचे मुख्यमंत्री असतानाची घटना. मुख्यमंत्र्यांचे एक संमेलन आयोजिण्यात आले होते. बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान व उत्तरप्रदेश या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना संमेलनासाठी बोला विण्यात आले होते. अशा संमेलनांच्या व्यासपीठामागे जो फलक लावला जातो त्यावर लिहिले होते, ‘बिमारू राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे संमेलन.’’ भैरोसिंगांनी हा फलक वाचल्यावर त्यांनी मध्यप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांना विचारले, मी तर काही आजारी नाही, तुमची प्रकृती ठीक आहे ना. अर्जुनसिंगांनी होकारार्थी उत्तर दिल्यावर मी अन्य राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना विचारले, त्यांनीही आपापली प्रकृती ठीक असल्याचे सांगितले. मग कोणीतरी मला बिमारू शब्दाचा अर्थ सांगितला. बिमारू शब्द बिहार, मध्यप्रदेश राजस्थान व उत्तरप्रदेश या चार राज्यांसाठी वापरण्यात आला होता. एका आय ए एस अधिकाऱ्याने आपले डोके जरा जादाच चालवून बी आय बिहारसाठी, एम ए मध्यप्रदेशसाठी आर राजस्थान व यु- उत्तरप्रदेशसाठी असे इंग्रजी शब्द वापरून बिमारू शब्द तयार केला होता. शेखावतांनी याला आक्षेप घेतल्यावर तो बदलण्यात आला. नोकरशाही कशी बिमारू असते हे तर भैरोसिंग सुचवीत नव्हते ना!

दरवाजा

काँग्रेस मुख्यालय असलेल्या २४ अकबर रोड या बंगल्यात नूतनीकरण सुरू आहे. नवनियुक्त सरचिटणीस राहुल गांधी यांच्या कक्षाला नवे रूप दिले जात आहे. सोनिया गांधी यांच्या कक्षाला लागून असलेला कक्ष जर्नादन द्विवेदी यांच्याकडे होता. हा कक्ष आता राहुल गांधींना देण्यात आला आहे. नूतनीकरणाबाबत स्वत: राहुल गांधी यांनीही काही सूचना दिल्या आहेत. त्यातील एका सूचनेने सर्वांनाच गोंधळात टाकले. सो नियाजी व राहुलजी यांच्या कक्षांना जोडणाऱ्या कक्षातील दरवाजाच उखडून टाकण्याचा आदेश राहुलजींनी दिला आहे. तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्यांना तो दरवाजा कायम ठेवण्याची सूचना केली, पण राहुल गांधी आपल्या निर्णयावर ठाम आहेत. माझ्या आईच्या आणि माझ्या खोलीत दरवाजा कशासाठी हवा असा प्रतिप्रश्न राहुलजींनी केल्यावर कोणालाही काही बोलता आले नाही. आता सोनियाजी व राहुलजी जवळपास एकाच कक्षातून पक्षाचे कामकाज चालविणार आहेत. अर्थात या दोघांनी पक्ष कार्यालयात येऊन कामकाज चालविले तर. यावर एका नेत्याची प्रतिक्रिया आहे, सध्या आमच्या पक्षात सारे काही टू-इन-वन सुरू आहे.

सूड

भारत-अमेरिका आण्विक कराराला कम्युनिस्टांनी लाल सलाम केल्यानंतर, या कराराला कोणी सुरुंग लावला याची चर्चा राजधानीत सुरू आहे. आणि यासंदर्भात एकच नाव घेतले जाते. ते आहे परराष्ट्रमंत्री प्रणवकुमार मुखर्जी. सोनिया गांधींनी मनमोहनसिंग यांना पुढे करून मुखर्जी यांना अपमानित करण्याची एकही

संधी सोडली नव्हती. ज्या मुखर्जींनी अर्थमंत्री या नात्याने मनमोहनसिंगांना रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर नियुक्त केले होते, त्यांना मनमोहनसिंगांच्या हाताखाली काम करण्यास सांगण्यात आले. नंतर त्यांचे संरक्षण मंत्रालयही काढून घेण्यात आले आणि शेवटचा अपमान म्हणजे मुखर्जींच्या हाता-तोंडाशी आलेले राष्ट्रप तिपद नाकारण्यात आले. या तिन्ही अपमानांचा सूड मुखर्जींनी आण्विक करारात घेतला. यात प्रणवबाबूंनी डाव्या पक्षांचा भरपूर वापर करून घेतला. सोनिया गांधींना हे सारे कळत होते. तशी व्यवस्था खुद्द मुखर्जी यांनीच केली होती. पण त्या काहीही करू शकत नव्हत्या. मुखर्जींना हव्या असलेल्या चाली कम्युनिस्ट खेळत होते तर कम्युनिस्टांना नको असणाऱ्या कराराचा शेवट मुखर्जी करीत होते. यात कराराचा खेळखंडोबा झाला. पंतप्रधान करार थंड्या बस्त्यात गेल्याने दु:खी होते तर मुखर्जींच्या चेहऱ्यावर सूडाचा आनंद दिसत होता.